● शुक्रवार, दि २० सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ५९ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## वचनपूर्ती करणारे आमदार बबनराव लोणीकर

### भाविकांनी व्यक्त केल्या भावना; नळडोहच्या संत जनार्दन महाराज संस्थानला १ कोटी खर्चाचे सभागृह मंजूर

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील नळदुहपेवा येथे श्रावण महिन्यामध्ये श्री संत जनार्दन स्वामी संस्थान या ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक एकत्र येऊन संपूर्ण महिनाभर कीर्तन प्रवचन व महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या कार्यक्रम प्रसंगी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर हे श्रावण महिना समारोप व महाप्रसाद कार्यक्रम प्रसंगी गेले असता विश्वस्थ मंडळी परिसरातील ग्रामस्थ व माता-भगिनींनी या ठिकाणी १०-१५ लाखाचा छोटेखानी सभामंडप देण्यात यावे अशी म ागणी केली होती

प्रसंगी हजारोंच्या संख्येने येणाऱ्या जनसम ुदायाला संबोधित करताना लोणीकरांनी १०-१५ लाख रुपयाचा नव्हे तर तब्बल १ कोटी रुपयांचे सभागृह तात्काळ मंजूर करून देऊ असा शब्द दिला होता त्या शब्दाला जागत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून दिनांक ११ सप्टेंबर २०२४ रोजी च्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील



तरतुदीतून लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या ग्राम ीण भागातील गावांतर्गत म ूलभूत सुविधा पुरविणे लेखाशीर्ष २५१५-१२३८ या योजनेअंतर्गत ६ कोटी रुपयांच्या विकास कामांना मंजुरी आणली असून त्यामध्ये श्री संत जनार्दन स्वामी महाराज संस्थान येथील १ कोटी रुपयांच्या सभागृहाचा समावेश करण्यात आला आहे.

नळडोह पेवा येथील सभामंडपाबरोबरच खांडवी व दैठणा बुद्रुक येथे देखील प्रत्येकी १० लक्ष रुपयांच्या सभामंडपाला मंजुरी देण्यात आलेले आहे त्याचप्रमाणे परतूर मंठा व जालना तालुक्यातील ९६ गावांमध्ये देखील प्रत्येकी ५ लाख रुपयांच्या सिमेंट रस्त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. सिमेंट रस्ते मंजूर करण्यात आलेल्या गावांमध्ये परतूर तालुक्यातील ५२ मंठा तालुक्यातील ४६ तर जालना तालुक्यातील नेर गावाचा समावेश आहे अशी माहिती देखील लोणीकरांच्या वतीने प्रसिद्ध देण्यात आलेल्या पत्रकात दिलेली आहे.

लेखाशीर्ष २५१५-१२३८ या योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या प्रत्येकी ५ लाख रुपये किमतीच्या सिमेंट रस्त्यांमध्ये परतुर तालुक्यातील सावंगी गंगाकिनारा गोळेगाव वडारवाडी संकलपुरी चांगतपुरी सावरगाव कोकाटे हदगाव, कोकाटे हदगाव तांडा पांडेपोखरी परतवाडी आनंदगाव फुलवाडी रायगव्हाण ब्राह्मणवाडी लिखित पिंपरी कारखाना अंगलगाव हनवाडी आष्टी (३) टाकळी शेलगाव राणी वाहेगाव सालगाव उस्मानपुर चिंचोली वरफळ वरफळवाडी कोरेगाव रायपूर सिरसगाव पिंपळा श्रीष्टी वाहेगाव श्रीष्टी आनंदवाडी माव शेवगा सोयांजना मसला डोलारा बाभळी बाबुल्तारा नांद्रा दहिफळ भोंगाणे खडकी कंडारी ब्रह्मवडगाव वाढोणा व वैजोडा या गावांचा समावेश आहे.

लेखाशीर्ष २५१५-१२३८ या योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या प्रत्येकी ५ लाख रुपये किमतीच्या सिमेंट रस्त्यांमध्ये मंठा तालुक्यातील नानशी सूर्य पिंपळगाव गोसावी पांगरी (२) कटाळा खुर्द आरडा तोलाजी वझर सरकटे बेलोरा माळेगाव (२) माहोरा केळवडगाव वाघोडा वाघोडा तांडा नायगाव वाडेगाव सरहद वडगाव कोकरंबा शिरपूर वाघाळा टाकळखोपा तळणी (३) माळकिनी वांजोळा आंधळवाडी सावरगाव वायाळ अंभोरा जहांगीर उमरखेडा तळतोंडी मुरूमखेडा माळतोंडी रामतीर्थकरणावर रानमळा गेवराई खारीआरडा विडोळी (२) मंगरूळ देवठाणा आवलगाव हातमन या गावांचा समावेश असून जालना तालुक्यातील नेर या ठिकाणी देखील सिमेंट रस्ता मंजूर करण्यात आला असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकात दिलेली आहे.

## खा. गांधी यांच्याविषयी बेताल वक्तव्याचा काँग्रेसकडुन निषेध




**जालना । प्रतिनिधी -** काँग्रेसचे राष्ट्रीय नेते खासदार राहुल गांधी यांच्या विषयी बेताल वक्तव्य करणारे भाजपचे खासदार अनिल बोंडे व आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात गुरूवार (दि १९) रोजी शहरात काँग्रेसतर्फे निषेध आंदोलन करण्यात आले. काँग्रेस कमिटीचे जिल्हा अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटीचे शेख मेहमूद यांच्या मार्गदर्शनाखाली मस्तगड येथे जिल्हा महिला काँग्रेस कमिटी, शहर जिल्हा काँग्रेस कमिटी व काँग्रेस सेवादलाच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. खासदार राहुल गांधी यांच्याविषयी बेताल वक्तव्य करणारे भाजपचे खासदार अनिल बोंडे व आमदार संजय गायकवाड याच्याविरुद्ध शासनाने गुन्हे दाखल करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी खासदार बोंडे व आमदार गायकवाड यांनी राहुल गांधी यांची जाहीर माफी मागावी , अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार, सेवादलाचे शहर जिल्हाध्यक्ष इब्राहीम शेख, प्रदेश महाराष्ट्र सरचिटणीस राम कुर्हाडे, शहर जिल्हा सरचिटणीस गणेश चांदोडे, मंथूरा सोळुंके, लतीफा शेख, इंदूबाई मैद, खैरूनिसा सय्यद, कांचन मोरे, फकिरा वाघ, प्रमोद अल्हाट, भागवत घाटे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्ह्यात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे आज प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील एकुण २८ महाविद्यालयामध्ये दि.२० सप्टेंबर २०२४ रोजी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ऑनलाईन उदघाटन होणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांनी तसेच नागरिकांनी जवळच्या प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटनस्थळी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

राज्यातील युवक व युवतींसाठी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियान राबविण्यात येत आहे. या माध्यमातून राज्यातीत अनेक सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींना आजपर्यंत विविध क्षेत्रात रोजगार प्राप्त झालेला आहे. प्रशिक्षणानंतर उत्तीर्ण उम ेदवारांना नोकरी व स्वयंरोजगाच्या संधी उपलब्ध होत आहेत. या दृष्टीकोनातून राज्यामधील नाम ांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करुन महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजने अंतर्गत राज्यातील १०१० नामांकित महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील २८ महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात येणाऱ्या या केंद्रांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि. २० सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता ऑनलाईन उद्घाटन होणार आहे.

जालना जिल्ह्यातील मॉडेल कॉलेज घनसावंगी, अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना, लाल बहादूर शात्री वरिष्ठ महाविद्यालय परतूर, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय मंठा, राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जालना, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बदनापूर, रावसाहेब पाटील दानवे कॉलेज ऑफ फार्मसी बदनापूर, ओजस कॉलेज ऑफ फार्मसी जालना, राजर्षी शाहू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पारध, लोकमान्य टिळक सीनियर कॉलेज सेवली, चैतन्य नर्सिंग स्कूल बदनापूर, श्री. रमेश भाऊ शेंडगे महाविद्यालय इंदेवाडी, ज्ञानसागर वरिष्ठ महाविद्यालय जाफ्राबाद,

पान २ वर

युवा आदर्श

### चष्मा ...

चषमिशांची असे
समान एक व्यथा
मिळत नाही चष्मा
हरिदासाची कथा
ऐन वेळी हरवतो
बडवू लागा माथा
कपाळावरी चष्मा
सर्वत्र करतो पृथा
आबाल वृद्ध सर्वा
चष्मा जसा देवता
मोद ना मावे नभी
चष्मावेळी धावता
घाईचे वेळी गायब
चष्म्याची ही प्रथा
पाय फुटे चष्म्याला
कोण आवरेल रथा
चष्म्याचा वरचष्मा
आवडे तो विधाता
चष्मा सापडून देता
सर्वोच्चस्थानी दाता
सेंसर हवा एखादा
चष्म्यासाठी आता
मागेल तसा मिळेलं
जागेवर योग्य यथा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## भविष्य निर्वाह निधी देण्यास विलंब लावणाऱ्यांची चौकशी करा

### पानेवाडीच्या मुख्याध्यापकाचे जिल्हा परिषदेसमोर उपोषण

**जालना । प्रतिनिधी -** भविष्य निर्वाह निधी ना-परतावा प्रस्ताव शिक्षण विभागाने हेतूपुरस्सर विलंब लावत आपला मानसिह व आर्थिक छळ केल्याचा आरोप करत घनसावंगी तालुक्यातील पानेवाडीच्या केंद्रीय जिल्हा परिषद प्रशाळेचे मुख्याध्यापक दिलीप गुलाबराव अंभोरे यांनी जिल्हा परिषदेसमोर उपोषण सुरु केले आहे. निधी मिळण्यात विलंब लावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवा हमी कायदयानुसार चौकशी करुन योग्य ती कठोर कारवाई करण्याची मागणी श्री अंभोरे यांनी सीईओ वर्षा मीना यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

श्री अंभोरे यांच्या उपोषणाला यविक महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष डॉ. रवींद्र काकडे, प्राथमिक शिक्षक संघाचे अरुण जाधव यांनी भेट देऊन पाठींबा जाहिर केला.

मुख्याध्यापक दिलीप अंभोरे यांनी भविष्य निर्वाह निधी ना-परतावा प्रस्ताव जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे १० जून रोजी सादर केला. तो प्रस्ताव शिक्षणाधिकारी यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. या प्रस्तावावर शिक्षणाधिकारी यांनी तब्बल १२ दिवसानंतर स्वाक्षरी केली. त्यामुळे २४ जून रोजी प्रस्ताव हा वित्त विभागाकडे पाठविण्यात आला. या विभागाने प्रस्तावाची तपासणी करून मान्यतेसाठी तब्बल एक महिना पाच दिवस एवढा कालावधी घेतला. सेवा हमी कायदयानुसार विहित



कालावधीत कार्यवाही होणे आपेक्षीत असतांना विलंब लावण्यात आला. अर्थपुर्ण व्यवहार केल्याशिवाय वित्त विभागातून प्रस्तावाला मंजुरी दिली जात नसल्याचा गंभीर आरोप मुख्याध्यापक अंभोरे यांनी केला आहे. माझ्या प्रस्तावाला विलंब झाल्याने २४ जुलै रोजी मी तक्रार दाखल केली होती. मात्र, वित्त विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी उलटपक्षी तपासणी करण्याचा प्रयत्न केला. यात घर बांधकामास विलंब होत असल्याने मला खाजगी बँकेकडुन कर्ज घ्यावे लागले. यामुळे मला मानसिक व आर्थिक छळाला सामोरे जावे लागले. सेवा हमी कायदयानुसार दप्तर दिरंगाईच्या व मानसिक, आर्थिक नुकसान केल्याची सविस्तर व वस्तुनिष्ट चौकशी करण्यात यावी. अशी म ागणीही श्री अंभोरे यांनी केली आहे.






जालना शहरात ईद-ए-मिलाद निमित्त मंगळ बाजार भागातून मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणुक कादराबाद - सराफा बाजार मार्गे फुल बाजार - मोती मस्जिद - महात्मा फुले मार्केट, अलंकार चौक, महावील चौक- सुभाष चौक मार्गे गरीबशाह बाजार येथे मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. दरम्यान, मिरवणुकीचे ठिकठिकाणी- चौकाचौकात पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात येत होते. आतिषबाजी व खाद्य पदार्थाचे वाटपही यावेळी करण्यात आले. ( छाया - जावेद तंबोली )

# अमेरिकेतील गन संस्कृती

अमेरिकेत सध्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीची धामधूम सुरू आहे. दोन महिन्यांनी म्हणजे नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक होणार असून या निवडणुकीत अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि ज्यो बायडेन यांच्या सरकारमध्ये उपराष्ट्राध्यक्ष राहिलेल्या मूळ भारतीय वंशाच्या कमला हॅरिस हे प्रतिस्पर्धी आहेत. दोघेही आपला प्रचार जोरदारपणे करीत आहे. दोघेही एकमेकांच्या तोडीस तोड असल्याने ही निवडणूक रंगतदार होणार आहे. दोघेही आपल्याला निवडून द्या अशी मागणी जनतेकडे करीत आहेत. निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असतानाच डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर दुसऱ्यांदा गोळीबार झाल्याची बातमी आली आणि जगभर खळबळ माजली. दोन महिन्यात डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर झालेला हा दुसरा जीवघेणा हल्ला आहे. सुदैवाने दोन्ही वेळा त्यातून ते बचावले. १३ जुलै रोजी अमेरिकेतील पेनिसिल्व्हिया राज्यातील एका प्रचार सभेत त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. त्यावेळी ट्रम्प यांच्यावर चालवण्यात आलेली गोळी त्यांच्या कानाला चाटून गेली होती. हा हल्ला सभेपासून जवळ असलेल्या छतावरून करण्यात आला. एका वीस वर्षीय तरुणाने त्यांच्यावर हल्ला केला होता. तो हल्ला ताजाच असताना त्यांच्यावर नुकताच असाच एक जीवघेणा हल्ला करण्यात आला. हा हल्ला डोनाल्ड ट्रम्प हे वेस्ट पाम बीच येथील गोल्फ कोर्स वर गोल्फ खेळत असताना त्यांच्यावर करण्यात आला. झुडुपात लपून बसलेल्या रायन रूथ या तरुणाने त्याच्या ए के ४७ या रायफल मधून त्यांच्यावर गोळीबार केला. दैव बलवत्तर म्हणून त्यांचा यावेळीही त्यांचा जीव वाचला. माजी राष्ट्राध्यक्ष राहिलेल्या आणि राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेल्या इतक्या मोठ्या जागतिक नेत्यांवर जीवघेणा हल्ला होणे हे अमेरिकेच्या गन संस्कृतीचे लक्षण आहे. जगासाठी जरी ही खळबळजनक घटना असली तरी अमेरिकेसाठी हे काही नवे नाही कारण याआधीही अमेरिकेच्या काही माजी राष्ट्राध्यक्षांवर असा जीवघेणा हल्ला झाला आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन, जेम्स गारफील्ड, विल्यम मॅकिनले आणि जॉन एफ केनेडी यांची हत्या झाली आहे. केवळ राजकीय नेतेच नाही तर जनता देखील या गन संस्कृतीला कायम बळी पडत आली आहे. गन संस्कुती मुळे अमेरिकेत लाखो नागरिक मरण पावले आहेत. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत मरण पावलेल्या नागरिकांची संख्या ऐकली तर आपल्याला धस्स होईल कारण अमेरिकेत गोळीबाराच्या घटनांमध्ये मागील पन्नास वर्षात १४ लाख लोकांना जीव गमवावा लागला आहे. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत दररोज सरासरी १०० लोक मरण पावतात. ही आकडेवारी थक्क करणारी आहे. कारण जागतिक महासत्ता असलेल्या देशात अशा प्रकारे लोकांचा जीव जात असेल तर ते धक्कादायकच नाही तर चिंताजनक देखील आहे. अमेरिकेत शाळेत गोळीबार झाल्याचा आणि त्यात अनेक शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याच्या बातम्या आपण नेहमीच ऐकतो, वाचतो अर्थात याला अमेरिकाच जबाबदार आहे. अमेरिकेत पूर्वीपासून गन संस्कृती अस्तित्वात आहे. दुकानातून फळे, भाजीपाला मिळतात तशा तिथे बंदुका विकत मिळतात. बंदुका चालवण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी आपल्याकडे जसा शासकीय परवाना काढावा लागतो तसा तिथे काढावा लागत नाही. तिथे बंदुका आणि काडतूस सहज मिळतात म्हणूनच तिथे गन संस्कृती उदयास आली. आता हीच गन संस्कुती अमेरिकेच्या मुळाशी आली आहे. अमेरिकेच्या या गन संस्कृतीवर अनेकांनी चिंता देखील व्यक्त केली आहे पण अमेरिकेच्या नेत्यांनी ती कधीही गांभीर्याने घेतली नाही. खुद्द डोनाल्ड ट्रम्प हे गन संस्कृतीचे मोठे समर्थक आहेत. २०१६ मध्ये त्यांनी दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी रिव्हॉल्वर व रायफल हे स्वसंरक्षणासाठी एक उत्तम शस्त्र असल्याचे म्हंटले होते. केवळ ट्रम्पच नाही तर अमेरिकेतील अनेक नेते हे गन संस्कृतीचे समर्थक आहेत. आता मात्र हीच संस्कुती त्यांच्या जीवावर उठली आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# महायुतीचे नकली बुरखे!

महाराष्ट्रात लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आपली वोटबँक शाबूत ठेवण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. त्याचबरोबर पक्षांतराला ऊत आला आहे. एकापक्षातून दुसऱ्या पक्षात जाण्यासाठी जोरदार फिल्डिंग लावली जात आहे. लोकसभेसारखाच विधानसभेत पुन्हा एकदा कटु अनुभव येऊ नये यासाठी महायुतीकडून अनेक कारनामे केले जात आहेत. मग कुणी महिलांना बुरखे वाटत फिरत आहेत तर कुणी मुस्लिम मतदारांना आकर्षित करण्यासाठी अजमेर शरीफचे दर्शन घडवताना दिसत आहेत. एरवी मुस्लिमांना विरोध करणारे आणि स्वतःला हिंदुत्वाचे तारणहार समजणारे एकगठ्ठा मतांच्या लाचारीसाठी स्वपक्षाचा अजेंडा पायदळी तुडवत आहेत. मशिदीवरील भोंग्यांना विरोध करणाऱ्या मनसेची मुस्लीम विरोधी भूमिका आता मवाळ झाली आहे का अशी चर्चा सुरू झाली आहे. त्याला कारण आहे की, मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी पंढरपुरातील एक हजार मुस्लीम बांधवांना अजमेर दर्शन घडवलं आहे. विधानसभेच्या तोंडावर राज्यातील पहिलाच प्रयोग या माध्यमातून मनसेने केला आहे. याचा जाब राज ठाकरे आपल्या जाहीर झालेल्या उमेदवारांना विचारणार की मुस्लिम मते मिळविण्यासाठी हिंदुत्वाला तिलांजली देणार याचे उत्तर राज ठाकरे यांना द्यावेच लागणार.

भाजपबरोबर सरकार स्थापन केल्याने महायुतीतील घटक पक्ष शिवसेना व राष्ट्रवादीच्या अजित पवार गटापासून मुस्लीम समाज दुरावला असल्याचे चित्र आहे. एकगठ्ठा मतपेटी असलेल्या या समाजाला विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आकर्षित करण्याचा प्रयत्न शिवसेना (शिंदे गट) करत असल्याचे दिसून येत आहे. भायखळा मतदारसंघाच्या शिंदे गटाच्या आमदार यामिनी जाधव यांनी मुस्लीम महिलांसाठी बुरखा वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शिंदे गटाला आता मुस्लीम समाजाची गरज वाटू लागली असल्याचे हे चिन्ह आहे. हिंदुत्ववादी पक्ष म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या आणि प्रसार माध्यमांसमोर हिंदुत्वाच्या फुशारक्या मारणाऱ्या महायुतीमधील शिवसेना गटाचे ढोंग उघडे पडले आहे. महायुतीमधील एका शिंदे गटामुळे संपूर्ण महायुतीच बदनाम होत आहे. हिंदुत्व सोडून काँग्रेस सोबत गेलेल्या शिवसेना (उबाठा) बाबत मुस्लिम समाजाला खात्री झाल्याने त्यांनी लोकसभा निवडणुकीत फतवे काढून उबाठा उमेदवारांना एकगठ्ठा मतदान केले. मुस्लिम मतांमुळेच उबाठाचे उमेदवार निवडून आले, अशी टिका महायुतीच्या नेत्यांकडून त्यावेळी होत होती. मग आता बुरखे वाटप करताना हिंदुत्व कुठे गेले याचे आत्मपरिक्षण संबंधितांनी करावे. लोकसभेत झालेला पराभव शिंदे गटाला



जिव्हारी लागल्यानेच मुस्लिम मते मिळवण्यासाठी बुरखे वाटले जात आहेत. ठराविक समाजाचे लांगुलचालन केले जात आहे. कितीही बुरखे वाटले आणि एखाद्या ठराविक समाजाचे लांगुलचालन केले तरी आगामी विधानसभा निवडणुकीत जनता महायुतीचा नकली बुरखा टराटर फाडल्याशिवाय राहणार नाही.

**दत्ता श्रावण खंदारे धारावी**
**९६९९३१३६२१**

श्री पी.एस. डी.टी.पी. ॲण्ड मल्टीसर्व्हीसेस्
कामासाठी मुले पाहिजे.
ऑनलाईन कामे, झेरॉक्स, डि.टी.पी. यापैकी कुठलेही काम येत असल्यास प्राधान्य तसेच शिकाऊ उमेदवार.
पत्ता :- मामा पेढेवाल्याच्या बाजुला, भांदरगे वकील समोर, शनी मंदिरजवळ, जुना जालना
मो.नं.9309588300

पान १ वरुन

## जिल्ह्यात आचार्य ...

भानुदासराव चव्हाण महाविद्यालय परतूर, पार्थ कला व विज्ञान महाविद्यालय नेर, गुरु गंगाभारती महाविद्यालय परतूर, जिजाऊ कला व विज्ञान महाविद्यालय वरुड (बु.), देवकी महाविद्यालय पिरपिंपळगाव, श्री रंगनाथ महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नाव्हा, ज्ञानसागर कनिष्ठ महाविद्यालय सिपोरा (आ.), रोकडेश्वर संस्कार विद्यालय विरुद्ध कनिष्ट महाविद्यालय उज्जैनपुरी, जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकल्याण, नवोदय पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय चणेगाव, न्यू पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय इंदलकरवाडी, गिरजा पूर्णा हायस्कूल व ज्यु. कॉलेज वालसा (खा.), मरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजूर, संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हसनाबाद, कै. दशरथ बाबा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय जवखेडा (खु) या २८ महाविद्यालयामध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात येत आहे. या कौशल्य विकास प्रशिक्षणाचा उमेदवारांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त भुजंग रिठे यांच्याशी (०२४८२-२९९०३३) संपर्क साधावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

स्त्रीला तिची स्वप्ने, भावभावना, इच्छा, आकांक्षा, विचार असतात. तिचे हे अस्तित्व जाणणारा शिक्षित पुरुष भेटला तर गार्गी, मैत्रेयी, झाशीची राणी, जिजाबाई, इंदिरा गांधी निर्माण होतात.

वरील राज्यकर्त्या स्त्रियांनी स्त्री सक्षमीकरणासोबतच समाजातील सर्व घटकांना सोबत घेतले. त्यामुळेच त्यांच्या राज्यात स्त्री-पुरुष असा भेद जाणवला नाही. आज मात्र स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर सुद्धा स्त्री सक्षमीकरणाच्या नावाखाली सुरू असलेल्या विविध योजना म्हणजे त्या आज स्त्री सक्षमीकरणास खरंच पूरक आहेत का? याबद्दल शंका निर्माण होते. पुरुषी मानसिकतेला व मक्तेदारीला तिलांजली द्यायला आजही आम्ही तयार नाहीत. यामुळेच तर आज स्त्रीची अब्रू ही सुरक्षित नाही. अशी अनेक उदाहरणे विविध प्रसार माध्यमांमधून सतत येत राहतात. त्यावर आंदोलनेही होतात.

वरील सर्व पार्श्वभूमीवर मला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षा निमित्त त्यांच्यातील स्त्री राज्यकर्ती व त्यांना घडवणारे माणकोजी शिंदे व सुभेदार मल्हारराव होळकर यांच्यातील पुरुष शिक्षणाचा भाव जाणवतो. तो खऱ्या अर्थाने सर्वांपर्यंत पोहोचावा म्हणून देशाचा शिल्पकार शिक्षक या नात्याने सर्वांच्याच डोळ्यात अंजन घालणारा हा लेख प्रपंच.

अहिल्याबाई होळकर म्हणजे तुम्हा आम्हा सर्वांच्या मनात असणारी ती प्रतिमा की ज्यात सात्विकता, सुशीलता, शितलता, पवित्रता, पुण्यता, चारित्र्यसंपन्नता, धर्मपरायणता, हातात शंकराची पिंड घेतलेली निस्सिम शिवभक्तीनी, जिच्या डोईवरचा पदर कधी ढळला नाही आणि काळजातला धीर कधी खचला नाही. अशा या लोकमाता, राजमाता, खऱ्या अर्थाने मानव धर्माच्या उपासक अहिल्यादेवींचे हे चित्र आज तुमच्या आमच्या सर्वांच्या मनात कोरलेल आहे.

आधुनिक पुरुषप्रधान व्यवस्थेत पुरुषांच्या मक्तेदारीवर मात करणारे व्यक्तिमत्व म्हणून आपण इंदिराजींचा उल्लेख करतो. पण याच प्रकारचं १८ व्या शतकात त्यावेळच्या पुरुषी मक्तेदारी व मानसिकतेवर प्रहार करणारे एक जबरदस्त व्यक्तिमत्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर.

अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ अहमदनगर जिल्ह्यात चोंडी या गावी झाला. वडील माणकोजी शिंदे आई सुशीलाबाई गावातील एक सुसंस्कृत कुटुंब होते. अहिल्या आठ वर्षाची असताना चोंडी गावाजवळ मराठी सैन्याचा तळ पडला होता. त्यामध्ये श्रीमंत पेशवे थोरले बाजीराव, सुभेदार मल्हारराव होळकर आणि इतर लहान-थोर मंडळी होतीच. तेथे जवळच असलेल्या शिव मंदिरात संध्याकाळच्या वेळी आठ वर्षाची अहिल्या दिवाबत्ती करत असल्याचे सुभेदार मल्हारराव होळकर व श्रीमंत पेशवे थोरले बाजीराव यांनी बघितलं. त्या मुलीची निडरता, धारिष्ट्य, एकाग्रता, कामाप्रती असलेली निष्ठा बघून श्रीमंत पेशवे थोरले बाजीराव यांनी सुभेदार मल्हारराव होळकर यांना सुचवले की त्यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजेच खंडेरावसाठी तिच्या वडिलांकडे मागणी करावी. त्यानुसार श्रीमंत पेशवे थोरल्या बाजीरावांच्या पुढाकाराने इ. स. १७३३ मध्ये अहिल्या आणि खंडेराव यांचा विवाह थाटामाटात पार पडला. पुढे मल्हाररावांनी अहिल्येची बुध्दिमत्ता, गुणवत्ता पाहून आपल्या मुलाच्या बरोबरीने सुनेलाही राज्य कसे चालवावे, घोडा कसा फेकावा, तलवार कशी चालवावी, धार कशी लावावी, तोफखाना कसा वापरावा, न्यायनिवाडा कसा करावा, लोकांना मदत कशी करावी, माणसे कशी पारखावीत, गनिमीकावा कसा करावा, धनुष्यबाण कसा चालवावा, भात्यामध्ये बाण कसे भरावेत. यासारख्या अनेक गोष्टींचे शिक्षण दिले. व्यक्ती मुळातच हुशार, चाणाक्ष व कर्तबगार असेल आणि असा थोरा-मोठ्यांचा मार्गदर्शक आधार असेल तर विकसित व्हायला वेळ लागत नाही. हे आजच्या सासू-सासर्यांनी अहिल्याबाईंच्या सासू-सासऱ्यांकडून शिकलं पाहिजे.

कित्येक पिढ्यांच्या गुलामगिरीतून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्यात वतनदारी, जहागीरदारी किंवा सरंजामशाहीला स्थान नव्हते. पण पुढे संभाजी महाराजांच्या क्रूर हत्येनंतर मुघल बादशहा औरंगजेबाने मराठी सरदारांना देऊ केलेल्या वतनाच्या लोभातून मराठी राज्य वाचविण्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी पुन्हा वतनदारी, जहागीरी सुरू केली. पुढे छत्रपती शाहूंच्या कालखंडात ती तशीच सुरू राहिली. पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथांनंतर पेशवे पदाची वस्त्रे पहिल्या बाजीरावांकडे आली. त्यांच्या चाणाक्ष व रत्नपारखी नजरेने मल्हाररावां मधील वेगळेपण ओळखले आणि माळव्याची मोठी जबाबदारी व सारंजाम मल्हाररावांकडे सुपूर्त केला. मल्हारराव अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आलेले. लहानपणीच वडील खंडोजी व आई जिवाई चे निधन झाले होते. मामा भोजराज यांच्याकडे लहानाचे मोठे झालेले. भोजराज पेशव्यांचे सरदार कदमबांडेंकडे होते. त्याच कदमबांडेंकडे मल्हारराव यांनीही सैनिक म्हणून सुरुवात केली. मल्हारराव म्हणजे एक ओजस्वी, तेजस्वी, रांगडं पण मायाळू व्यक्तिमत्व. दृष्टी काळाच्या फार पुढची होती. त्यांनी आपली पत्नी म्हणजे मामाची मुलगी गौतमीलाही बरोबरीने शिक्षण दिले व अधिकारही दिले. युद्ध काळातही सैन्य व्यूहरचना करताना आधी गौतमीबाईंचा व नंतर सुनबाई अहिल्याबाईंचाही सहभाग असे. युद्धात राखीव सैन्याचे महत्त्व अहिल्याबाई जाणत होत्या. इतकेच नाही तर मराठ्यांकडे असलेल्या अनेक मनसबदारांपैकी केवळ मल्हाररावांची पत्नी गौतमीबाईंच्या नावाने स्वतंत्र खाजगीतील दौलत पेशव्यांकडून देण्यात आली होती. ही खाजगीतली दौलत गौतमीबाईंकडून पुढे तशीच अहिल्याबाईंकडे आली आणि होळकरांना दोन प्रकारच्या खाजगी दौलतीचा हिशेब ठेवावा लागत होता. एक मल्हाररावांच्या पत्नीकडे असलेल्या खाजगीतली दौलतीचा आणि सुभेदार मल्हारराव म्हणून त्यांच्याकडे मराठा साम्राज्याचा प्रतिनिधी म्हणून आपल्या सैन्याच्या दाणापाण्यासाठी मिळालेल्या सारंजामचा.

इसवी सन १७५४ मध्ये कुंभेरीच्या वेढ्यात खंडेराव यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यावेळी अहिल्याबाईंना दोन मुलं होती. त्या सती जायला निघाल्या. पण सासऱ्यांच्या आग्रहाने त्या सती गेल्या नाहीत. पुढे काळाच्या ओघात सासुबाई गौतमीबाई, इ. स. १७६६ मध्ये सासरे मल्हारराव, मुलगा भालेराव, व नातू नाथोबा, जावई यशवंतराव फणसे यांचे निधन झाले. मुलगी मुक्ता सती गेली. वैयक्तिक आयुष्य प्रचंड दुःखाचे असले, विपरीत घाव झाले तरी तब्बल २९ वर्ष अहिल्याबाईंनी रयतेचे अश्रू पुसत एक हाती राज्य केले. ही त्यावेळच्या कालखंडात आणि पुरुषप्रधान व्यवस्थेत साधी आणि सोपी गोष्ट नव्हती. दुःखाचे डोंगर समोर असतानाही

होळकरांचे दिवाण गंगाधर चंद्रचूड यांच्या सल्ल्यानुसार रघुनाथराव पेशवे याचे आक्रमण अहिल्याबाईंनी मोठ्या चतुराईने परतवून लावले. ते ऐतिहासिक वाक्य तुम्हा आम्हा सर्वांना माहित आहे.

मी हरली तर फारसा फरक पडणार नाही, पण आपण मराठी सत्तेचे अटकेपार झेंडे गाडणारे बाईकडून पराभूत झालात तर तुमची सर्वत्र अपकीर्ती, अवहेलना आणि कुचेष्टा होईल. यातील राजकारण रघुनाथरावांच्या लक्षात येताच त्यांनी सैन्याला माघारी पाठवले व मी युद्धाला नाही तर

आपल्यावर आलेल्या दुःखाच्या सांत्वनाला येत आहे. असा निरोप पाठवला.

हे सर्व जरी असले तरी आज तुम्हा आम्हा सर्वांना अहिल्याबाई आठवतात. लक्षात राहतात. त्या त्यांच्या सामाजिक कार्यामुळे. हिमालयापासून कन्याकुमारी पर्यंत आणि बंगालच्या उपसागरापासून अरबी समुद्रापर्यंत अखंड भारतामध्ये अहिल्याबाईंनी केलेल्या कार्याचे दाखले मिळतात. ठिकठिकाणी विहिरी, घाट, मठ, मंदिरे, पाणपोया, अन्नछत्रे, अन्नशाळा, धर्मशाळा, संस्कार वर्ग, आश्रम शाळा, ग्रंथागार, यज्ञशाळा, यज्ञकुंड, तलाव हे सर्व लोकांच्या सोयी सुविधेसाठीच. हे बनविण्यासाठी लागलेला पैसा हा त्यांनी त्यांच्या खाजगीतील संपत्ती मधून केला. याशिवाय अनेक जुन्या मंदिरांचा जिर्णोद्धारही केला. ईश्वरा प्रति त्यांची नितांत श्रद्धा होती. त्यांच्या मते *ईश्वराने मला हे राज्य करण्याची जबाबदारी दिली आहे आणि याचे उत्तर मला ईश्वरालाच द्यायचं आहे* म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक या उपाधीने जनतेनेच सन्मानित केले. त्यांची ही भूमिका आजच्या राज्यकर्त्यांनी अंगीकारली तरी देश विकसित व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळे अहिल्याबाईंची ही भूमिका आपण सर्वांनी स्वीकारावी असे मला वाटते. किमान माझे स्वतःचे काम मी प्रामाणिकपणे करतो का? याच आत्मचिंतन प्रत्येकाने केलं तरी खूप मोठा बदल होईल. अहिल्याबाईंच्या या धोरणाचा परिणाम म्हणूनच माळवा प्रांतात शांतता, स्थैर्य, व्यापार, उद्योगधंद्यांचा विकास झाला. शेतीला प्राधान्य दिल्याने हा प्रदेश हिरवागार झाला. परकीय आक्रमणे किंवा दुष्काळ या कालखंडात शेतकऱ्यांना शेतसारा माफ असे. महत्त्वाचं म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच अहिल्याबाईंनी शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक ते सर्व बी-बियाणे व साहित्य उपलब्ध करून दिले. धनसंपत्ती दिली नाही. पण कोणी उपाशी राहणार नाही याचीही काळजी घेतली. राज्यातील जमिनीचे पाच भाग केले व एक भाग हा तेथील जनावरांसाठी राखून ठेवला. थोडक्यात अहिल्याबाईंनी छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच प्रजाहितदक्षतेचे राज्य केले. प्रजेचे गोमटे झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. कल्याणकारी राज्य निर्माण केले. प्रजेची काळजी पोटच्या पोरासारखी घेतली. प्रजा राजाहून मोठी आहे ही भावना जपली. आज आपण याचा विचार करण्याची नितांत आवश्यकता आहे. देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी चार ज्योतिर्लिंगांची निर्मिती अहिल्याबाईंनीच केली. याशिवाय इतर सर्व ज्योतिर्लिंगांना नव रूप प्राप्त करून दिले. धर्मशास्त्र, युद्धशास्त्र, कला, नीती, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, भाषा, नवीन कायद्यांची निर्मिती यावर अहिल्याबाईंनी काम केले. सोमनाथांचे मंदिर बांधले. असं म्हणतात की साधारणतः ११००० मंदिर बांधण्यात किंवा त्यांचा जीर्णोद्धार करण्यात अहिल्यादेवींचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी कुंभमेळ्यास राजश्रय दिला. वेद पाठशाळा ही सुरू केल्या. देशभर रस्ते बांधले. कलकत्ता ते काशी असा हमरस्ता तयार केला. रस्त्याच्या दुतर्फा झाडी लावली. थोडक्यात जगाला वंदनीय होईल असे कार्य केले. यातूनच असंख्य लोकांना रोजगार मिळाला. देशभरातील प्रतिभा संपन्न कारागीरांना माहेश्वरीत आमंत्रित केले. माहेश्वरी साडी उद्योग निर्मितीचे व विविध उद्योगाचे केंद्र बनले. पुढे माहेश्वरी ही व्यापारी पेठ म्हणून नावारूपाला आले. कलाकारांना राजश्रय दिला. अहिल्यादेवींनी ही कामे करताना स्थानिक सत्ता कोणाचीही असली तरी तेथील राज सत्तेशी संवाद साधत मंदिरे बांधण्याची कामे पूर्णत्वास नेली. औरंगजेबाने काशी विश्वेश्वराचे मंदिर तोडून मज्जित बांधली होती. स्थानिक नवाबाशी चर्चा करून अहिल्यादेवींनी तेथे त्याच्याच बाजूला काशी विश्वेश्वराचे पुन्हा मंदिर बांधले. काशीला विद्यालय बांधले. धर्मशास्त्र, खगोलशास्त्र, व्याकरण, गणित या विषयांचे पंडित त्या ठिकाणी नेमले. त्यांनी भीमाशंकराचे मंदिर बांधले. जेजुरीला खंडेरायाच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजही अहिल्यादेवींनी सुरू केलेल्या सर्व कामांसाठी लागणारा खर्च हा होळकरांच्या ट्रस्ट मधून केला जातो. ब्रिटिश आमदनीतही तो याच पद्धतीनेच सुरू होता.

याशिवाय राज्यात हुंडाबंदी केली. सती प्रथा कायद्याने बंद केली. शाहिरांना प्रोत्साहन दिले. लावणीतही भक्ती आणली. विविध कलांना उत्तेजन दिले. मराठीतील सर्वकालिक श्रेष्ठ कवी मोरोपंत अहिल्यादेवींच्या राजदरबारात होते. केदारनाथला अहिल्यादेवींनी धर्मशाळा बांधली. अशीच धर्मशाळा रामेश्वरलाही बांधली. या देशात पहिला सामूहिक विवाह सोहळा अहिल्यादेवींनी घडवून आणला. आज पाकिस्तानात असलेल्या कराची जवळ शिवमंदिर बांधले तर काठमांडू मधील पशुपतिनाथाच्या मंदिराचाही जीर्णोद्धार केला. या सर्वांचा परिणाम अगदी स्पष्ट सांगायचं तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडाप्रमाणेच अहिल्यादेवींच्या कालखंडात शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ नाही आली. राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे यावर त्यांची प्रचंड श्रद्धा होती.

राज्यात दरडेखोरांचा धुमाकूळ सुरू होता. अहिल्यादेवींनी घोषणा केली जो कोणी या दरोडेखोरांचा बंदोबस्त करेल त्याला माझी मुलगी पत्नी म्हणून देईल आणि त्यानुसार यशवंतराव फणसे नामक युवकाने दरोडेखोरांचा बंदोबस्त केला आणि अहिल्यादेवींनीही दिलेल्या शब्दाप्रमाणे आपली मुलगी मुक्ता हिचा त्याच्याशी विवाह लावून दिला. हा विवाह लावताना जात, धर्म, पंथ याचा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही.

राज्याच्या सीमेवर असणारे दरोडेखोर रामोशी, गौंड, भिल्ल या आदिवासींना विश्वासात घेऊन त्यांना राज्याच्या सीमावर्ती भागात सीमांचे रक्षणकर्ते बनविले. त्यांच्यासाठी भिलकवडी नामक कर सुरू केला. त्यांना नियमित वेतन सुरू केले. जे नागरिक हे काम करू शकत नव्हते त्यांना तेथील जमिनी कसण्यासाठी आपापसात वाटून दिल्या व उत्पन्नाचा एक भाग सरकारात जमा करण्यास सांगितले.

अहिल्यादेवींची राहणी अतिशय साधी होती. सतत सफेद वस्त्र परिधान केले. कधीही अलंकार वापरले नाहीत पण समस्त भारताला आपल्या कामाने अलंकारिक करून सोडले. माहेश्वरीत एका घोंगडीवर बसून त्या राज्यकारभार करीत. कोणत्याही प्रकारचा ऐशारामी डामडौल नव्हता. ही कामे करताना त्यांनी कधीही दौलतीचा म्हणजे सरकारचा पैसा वापरला नाही. सर्व खर्च हा होळकरांच्या खाजगीतील संपत्तीतून झालेला असे. रोज पहाटे पाच वाजेपासून त्यांच्या कामाला सुरुवात होई तर संध्याकाळी उशिरापर्यंत कामे सुरू असत. यानिमित्ताने आपण आपला खरा इतिहास जाणून घेतला पाहिजे. तो अंगीकारलाही पाहिजे. स्त्री पुरुष समानतेसाठी हा लेख एक नवी पहाट ठरेल या अपेक्षेसह माझ्या लेखा संदर्भातील लेखणीला विराम देतो.

धन्यवाद.

**प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे,**
**के.रा. कोतकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली, ९९६७८१७८७६**
prashantshirude1674gmail.com

दिव्यांगाना १५ लक्ष रुपये किंमतीचे सहाय्यक उपकरण साहित्याचे वाटप

# दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासाकरीता राज्याच्या विविध कल्याणकारी योजना - आ. लोणीकर





**परतूर । प्रतिनिधी -** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील राज्यातील महायुतीचे सरकार व केंद्र सरकार दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासाकरिता राज्यभरात कल्याणकारी योजना राबवित असून यांचा लाभ प्रत्येक दिव्यांग व्यक्तींनी घ्यावा असे आवाहन माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी परतुर पंचायत समिती येथे तालुक्यातील २३३ दिव्यांग बांधवांना १५ लक्ष रुपये किंमती चे उपयोगी सहाय्यक उपकरण साहित्यांचे वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी आ. लोणीकर बोलत होते.

या उपयोगी सहाय्यक उपकरण साहित्यात बॅटरी ऑपरेटेड ट्रायसायकल, ट्रायसायकल, व्हीलचेअर आणि सीपी चेअर, एक्सीलरी क्रचेस / चालण्याच्या काठ्या इ. ब्रेल छडी, ब्रेल किट, सुगम्या छडी, BTE श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव इत्यादींचा समावेश होता. यावेळी उपस्थित दिव्यांग बांधवांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या वेळी व्यास व्यासपीठावर आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शत्रुघ्न कणसे, परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संभाजी वारे, उपसभापती रवी सोळंके, सरपंच सिताराम राठोड, प्रवीण सातोणकर, कृष्णा आरगडे, परतुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तांगडे यांची उपस्थिती होती.

यावेळी हजारो दिव्यांग बांधवांना मार्गदर्शन करतांना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की दिव्यांग बांधवांकरीता राज्य व केंद्र सरकार ज्या ज्या योजना राबविण्यात आहे त्या सर्व योजना चा लाभ दिव्यांग बांधवांना मिळावा याकरिता आपण तहसील कार्यालयात आढावा घेणार असून. परतूर विधानसभा मतदारसंघातील सर्व दिव्यांग बांधवांना मासिक अर्थसाह्य उपलब्ध व्हावे. त्याकरिता लवकरच दिव्यांग बांधवांच्या मेळाव्याचे आयोजन करणार असल्याचेही आ. लोणीकर यांनी यावेळी उपस्थितांना सांगितले.

दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी रक्कम रू. १५000/- अर्थसहाय्य दिले जाते. ज्या दिव्यांग व्यक्तिंना समाज विकास विभागामार्फत सुरू असलेल्या व्यवसाय प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षण घेणे अडचणीचे असल्यास शासनमान्य अधिकृत संस्थेत प्रवेश घेतला असेल अशा संस्थेस जास्तीत जास्त रक्कम रू.१0,000/- किंवा संस्थेची प्रशिक्षणासाठी असणारी फी या पैकी जी रक्कम कमी असेल ती प्रशिक्षण खर्चा पोटी देण्यात येते. जे दिव्यांग विद्यार्थी इ. १0 व इ. १२ वी नंतर तांत्रिक, वैद्यकिय, इंजिनिअरींग, व्यवस्थापकीय, संगणकीय किंवा इतर उच्च शिक्षणासाठी किंवा विद्यापीठ मान्यता प्राप्त तांत्रिक कोर्सला प्रवेश घेतील अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कालावधीत रु.२0,000/- अर्थसहाय्य दिले जाते.

# लॉयन्स क्लबतर्फे आयोजित शिबिरात २६२ गणेश भक्तांची नेत्र तपासणी



**जालना । प्रतिनिधी -** गणेशोत्सवाच्या निमित्ताने लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे आर. पी. रोड येथे गणपती देखावा बघण्यासाठी येणाऱ्या भक्तांसाठी आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात २६२ गणेश भक्तांनी नेत्र तपासणी करून घेतली.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी काँग्रेसचे युवा नेते अक्षय गोरंट्याल यांनी उपस्थित राहून या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. यावेळी लायन्स क्लब जालनाच्या अध्यक्षा जयश्री लड्ढा, सचिव मंजु श्रीमाली, कोषाध्यक्ष कल्पना बियानी तसेच लायन्स क्लबच्या सर्व सदस्य उपस्थित होते. शिबिरामध्ये दृष्टि रक्षक व्हॅनद्वारे भक्तांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्याच ठिकाणी लॉयन्स क्लबतर्फे भक्तांना प्रसाद स्वरूपात आठ हजार माखन वडाचे वाटप करण्यात आले. लायन्स क्लबच्या दृष्टिरक्षक वॅनद्वारे दररोज ग्रामीण भागात जाऊन नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जातात. तपासणीत मोतीबिंदू आढळल्यास, चिखलठाणा येथील लायन्स हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया केली जाते. ही सेवा मागील ६ वर्षांपासून सुरु असून, आजपर्यंत १५ हजारहून अधिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. तसेच, १ लाखाहून जास्त नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली आहे. याशिवाय, परतूर येथे लायन्स क्लबच्यावतीने वर्षभरापूर्वी नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया हॉस्पिटल सुरू करण्यात आले आहे. तेथे गरजू रुग्णांना मोफत सेवा दिली जाते. लायन्स क्लबचे डोळ्यांवरील सेवाकार्य संपूर्ण जगभरातील गरजूंना उपलब्ध आहे.लायन्स क्लब जालना यंदा ५७ वर्षे पूर्ण करत असून, त्यांच्या निरंतर सेवाकार्याची परंपरा अविरत सुरू आहे.

# लॉयन्स क्लबतर्फे गुरु गणेश तपोधाममधील भक्तांसाठी व्हीलचेयर व वॉकरचे लोकार्पण



**जालना । प्रतिनिधी -** गुरु गणेश तपोधाममध्ये भक्तांच्या सोयीसाठी जालना लॉयन्स क्लबतर्फे व्हीलचेयर आणि वॉकरचा लोकार्पण सोहळा जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेश सकलेचा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रमुख उपस्थिती म्हणून विश्वस्त डॉ. रुणवाल आणि कुंकुलोळ उपस्थित होते.

यावेळी लायन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा, सचिव मंजू श्रीमाली, माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया, अतुल लड्ढा, जयप्रकाश श्रीमाली आणि विजय दाड यांची या प्रसंगी उपस्थिती होती. व्हीलचेयर आणि वॉकरचे योगदान माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया यांनी दिले असून,भक्तांना दर्शन सुलभतेने घडविण्यास मदत करणे, हा त्यामागील उद्देश आहे.

'स्वच्छता ही सेवा' या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ

# सफाई कर्मचारी हा खरा हिरो - मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी -** देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली 'स्वच्छ भारत अभियान' सुरू करून एक चळवळ उभी केली. त्याचे फलित म्हणजे आज देशभरात हे अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. स्वच्छता हा आरोग्याचा मंत्र असून मुंबईमध्ये 'डीप क्लिन ड्राईव्ह'च्या माध्यमातून रस्ते साफ करणे, रस्ते झाडणे, पाण्याने रस्ते धुणे हे काम सुरू आहे. यामुळे मुंबईचे प्रदुषण कमी झाले असून सफाई कर्मचारी हाच खरा मुंबईचा हिरो असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

स्वच्छता ही सेवा-२०२४ (ड्क्ड) या राज्यस्तरीय अभियानाचा मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंग्री मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई महानगर पालिका आयुक्त भूषण गगराणी, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के.एच.गोविंदराज, मुंबई जिल्हाधिकारी संजय यादव, मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, सेना दलाचे अधिकारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, सफाई कर्मचारी, नागरिक आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी शुभारंभ केलेले हे राज्यस्तरीय अभियान महात्मा गांधी जयंती म्हणजे २ ऑक्टोबरपर्यंत चालणार असून राज्यातील नागरी व ग्रामीण भागात 'स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. या स्वच्छता पंधरवडा मोहिमेकरिता सर्वांची भागीदारी असायला हवी, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. मुख्यमंत्री म्हणाले की, स्वच्छता ही सेवा अभियानाच्या उपक्रमाद्वारे आर.आर.आर. (रिड्युस, रियुज, रिसायकल) केंद्र उभारून पर्यटन स्थळावर शुन्य कचरा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांअंतर्गत वृक्षारोपण आणि सौंदर्यीकरण करण्याचे काम सुरू आहे. नियमित स्वच्छ न होणारी ठिकाणे शोधण्यात आली असून अशी ठिकाणे कायमस्वरूपी स्वच्छ राहील, याकरिता त्रिसुत्री नियोजन करण्यात आले आहे. यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, स्वच्छ भारत अभियानात महाराष्ट्र कुठेही कमी पडणार नाही. स्वच्छ भारत अभियानात देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते या अभियानांचा शुभारंभ झाला. गिरगाव चौपाटी येथे मुख्यमंत्र्यांनी स्वतः स्वच्छतेची सुरूवात केली. त्यानंतर त्यांनी ट्रॅक्टर चालवून मशीनद्वारे कचरा संकलन केले. त्याचबरोबर 'करूया वाईट विचार नष्ट, स्वच्छ करूया आपला महाराष्ट्र' हा संदेश देणाऱ्या फलकावर स्वाक्षरी केली.



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जागतिक कृषी पुरस्काराने गौरव

## महाराष्ट्राच्या शाश्वत शेती प्रयत्नांचा जगाकडून गौरव - राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

**मुंबई । प्रतिनिधी -** जागतिक कृषी पुरस्कारामुळे महाराष्ट्राच्या शाश्वत शेतीच्या प्रयत्नांवर जगाने मोहोर उमटवली आहे. महाराष्ट्राने नेहमीचे भारतातील कृषी क्षेत्रात प्रयोगशीलता राबवल्याचे या पुरस्कारामुळे सिद्ध झाले, अशा शब्दांत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रदान करण्यात आलेल्या जागतिक कृषी पुरस्कारांबद्दल कौतुकोद्गार काढले आहेत.

पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या कामाची दखल घेऊन 'वर्ल्ड ग्रीकल्चर फोरम'कडून त्यांना जागतिक कृषी पुरस्काराने आज सन्मानित करण्यात आले. फोरमचा हा दुसराच पुरस्कार असून हा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मुख्यमंत्री श्री शिंदे यांना प्रदान करण्यात आला. जागतिक बांबू दिनाच्या औचित्याने या समारंभाचे आयोजन करण्यात आले. एनसीपीएच्या सभागृहात झालेल्या या समारंभास महाराष्ट्र कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, 'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम'चे अध्यक्ष डॉ. रुडी रॅबिंगे, फोरमचे आशिया प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. विलियम्स दार, आफ्रिका प्रांताचे उपाध्यक्ष प्रो. लिंदवे सिंबादा, अमेरिका प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. केनिथ क्वीन्, फोरमचे भारतातील संचालक तथा इंडियन चेंबर ऑफ फूड ग्रीकल्चरचे अध्यक्ष डॉ एमजे खान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमचा जागतिक कृषी पुरस्कार हा महाराष्ट्रातील राबणाऱ्या शेतकऱ्यांना अर्पण करत असल्याचे नमूद करून महाराष्ट्राला शेतीच्या क्षेत्रातही पहिल्या क्रमांकाचे राज्य बनविण्यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

राज्यपाल म्हणाले की, राज्यातल्या कृषी विद्यापीठांमध्ये कृषी क्षेत्राशी संबधीत नवनवीन तंत्रज्ञानाविषयी संशोधन करण्यात येत आहे. या नवनवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद आणि आर्थिक सुबत्ता निर्माण करत असल्याचा सार्थ अभिमान आहे. मुख्यमंत्री यांना मिळालेला पुरस्कार महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रातील यशाचे आणि शाश्वत शेतीतील प्रयोग आणि प्रयत्नांचे जागतिक पटलावर प्रतिबिंबित करणारा आहे. हा पुरस्कार केवळ मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचेच नव्हे, तर महाराष्ट्राच्या कृषी नवकल्पना आणि पर्यावरणीय शाश्वततेमध्ये केलेल्या जागतिक पातळीवरील योगदानाचा सन्मान आहे. महाराष्ट्राने भारताच्या कृषी क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण स्थान आबाधित राखले आहे. आपले शेतकरी, आपल्या अन्नसुरक्षेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असून त्यांच्या जिद्दी आणि कष्टांनी देशाचा कणा बनले आहेत.

यावेळी राज्यपाल म्हणाले की, दुष्काळ, पाण्याची कमतरता, पूर आणि हवामान बदल यांसारख्या असंख्य आव्हानांनंतरही, महाराष्ट्राने आपली ताकद आणि अनुकूलता दाखवली आहे. आम्ही शेतकऱ्यांना प्रगत बियाणे, खत आणि आधुनिक शेती साधनांनी सुसज्ज केले आहे, तसेच सूक्ष्म सिंचन यांसारख्या नाविन्यपूर्ण पद्धतींचे प्रशिक्षण दिले आहे. कृषी विद्यापीठांशी असलेल्या सहकार्यामुळे अत्याधुनिक संशोधनाचे प्रत्यक्ष वापरामध्ये रूपांतर होऊन उत्पन्न वाढले आहे.

मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले की, आजच्या पर्यावरण बदल आणि तापमान वाढीचा काळात पर्यावरण संरक्षण आणि कृषी यांचे संतुलन राखणे ही काळाची गरज आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने आजचा हा पुरस्कार स्वीकारतो आणि राज्यातील सर्व शेतकऱ्यांना हा पुरस्कार समर्पित करतो. आजच्या काळात अन्न सुरक्षा महत्वाची आहे. लोकांचे पोट भरण्याचे महत्वाचे काम शेतकरी करतो. त्यामुळे त्याला अन्नदाता म्हणतात. शेतकरी आणि शेती महत्वाची आहे. वातावरण बदल आणि तापमान वाढीचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसतो. त्यामुळेच तापमानवाढ कमी करणे ही गरज असून त्यासाठी राज्य शासनाने पर्यावरण कृती समितीची स्थापना केली आहे. राज्यात २१ लाख हेक्टर बांबू लागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. पूर, अतिवृष्टी, दुष्काळ या सारथ्य नैसर्गिक संकटाना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते. शेतकरी हा नवीन बदलांनाही स्वीकारत आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतीचा विकास आणि शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. सिंचनाच्या १२५ प्रकलपणा मंजुरी देण्यात आली असून शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणे हे शासनाचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे ग्रोथ इंजिन आहे. देशाच्या जीडीपीमध्ये राज्याचा मोठा वाटा आहे. रोजगार, थेट परकीय गुंतवणूक, विकास यामध्ये राज्य देशात आघाडीवर आहे. कृषी विकासातही राज्य आघाडीवर आहे. शेतकऱ्यांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहे. १ रुपयात पीक विमा देणारे 'महाराष्ट्र' हे देशातील पहिले राज्य आहे. नमो शेतकरी सन्मान योजनेत केंद्र शासनाच्या ६ हजार रुपयांव्यतिरिक्त राज्य शासन ६ हजार रुपये देते, असे शेतकऱ्यांना वर्षाला १२ हजार रुपये मिळत आहेत. येत्या दोन वर्षात ५ लाख सौर कृषी पंप देण्याचे उद्दीष्ट आहे. तसेच १७ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचे उद्दीष्ट आहे. शेतीला चोवीस तास विद्युत पुरवठ्यासाठी प्रयत्नशील आहोत. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमध्ये देण्यात येणाऱ्या मदतीमध्ये भरघोस वाढ करण्यात आली आहे. एनडीआरएफच्या निकषांच्या दुप्पट मदत केली जाते. २ हेक्टरची मर्यादा ३ हेक्टर करण्यात आली आहे. देशाची आर्थव्यवस्था ५ ट्रिलीयन करण्याचे ध्येय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ठेवले असून यामध्ये महाराष्ट्र १ ट्रिलीयन अर्थव्यवस्था निर्माण करून भरीव योगदान देईल. पर्यावरण संरक्षण, विकास आणि कृषीचा शाश्वत विकास यासाठी सर्वांच्या सहयोगाची गरज आहे. यात उद्योग आणि अन्य क्षेत्रांबरोबरच शेती आणि शेतकऱ्यांचेही महत्वपूर्ण योगदान राहीले. वर्ल्ड ग्रिकल्चर फोरमचे उपाध्यक्ष विल्यम दार यांनी प्रस्तावनेमध्ये पुरस्काराचे स्वरूप आणि निवड पद्धती याविषयी माहिती दिली. आभार प्रदर्शन जागतीक कृषी परिषदेचे राष्ट्रीय संचालक एम.जे.खान यांनी व्यक्त केले.

# जिद्द चिकाटी व मेहनत यामुळेच यशाचे शिखर गाठता येते - दांडगे

**जालना | प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र जालना यांच्या वतीने जालना येथे गुरुवार (दि १९) रोजी एक दिवशीय उद्योजकता विकास कार्यशाळा घेण्यात आली.यावेळी के डी दांडगे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन, जालना, गाडेकर,सदस्य ग्रा. पं.पिंपळगांव शेरमुलकी,शेख शरीफ डोणगाव यांचें मार्गदर्शन लाभले. या वेळी अजय रगडे, योगेश रगडे, सचिन रगडे , गजानन साळवे, हर्षवर्धन रगडे , गुलाब साळवे रा.पिंपळगांव शेरमुलकी व ईतर प्रशिक्षणार्थींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री दांडगे म्हणाले की उद्योग उभारण्यासाठी व मोठ्या प्रमाणात यशस्वी होण्यासाठी जिद्द चिकाटी व मेहनत घेतली तरच माणूस यशोशिखरावर पोहोचु शकतो त्यासाठी या प्रशिक्षणात बारकावे समजून सांगितले.या प्रशिक्षणात सौर ऊर्जा , विद्युत वाहणे,सायबर सुरक्षा,बंदीस्त शेळीपालन,कुकूटपालन,दुग्ध व्यवसाय, जैविक खते, रेशीम उद्योग, दालमिल,विटा तयार



करणे, मसाला उद्योग,गृह उद्योग, कांडी कोळसा,शेती पूरक व्यवसाय या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे, जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन द्वारा पत्रकार भवन , एस पी ऑफिस समोर जालना मो.९४२३७३०९२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# सिद्धार्थ महाविद्यालयाच्या वतीने निर्माल्य संकलन व नदी स्वच्छता अभियान संपन्न

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** येथील सिद्धार्थ महाविद्यालयाच्या वतीने १७ व १८ सप्टेंबर २०२४ रोजी *ग्रीन क्लब *व * राष्ट्रीय सेवा योजना* विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जाफराबाद येथे, गणपती विसर्जना निमित्त निर्माल्य संकलन मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेचा उद्देश जे निर्माल्य पाण्यामध्ये विसर्जित केल्या जाते त्यामुळे जल प्रदूषणाचा धोका निर्माण होतो. तो टाळण्याकरिता महाराष्ट्र शासन व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन युवकांच्या सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण तसेच पाण्याची बचत या अभियानांतर्गत अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने रेपाळा रोड येथील गणपती विसर्जनाच्या ठिकाणी जाऊन महाविद्यालयातील युवकांनी निर्माल्य संकलित केले तसेच या निर्माल्याचे संकलन केल्यानंतर जैविक खत तयार करण्यासाठी या निर्माल्याचा महाविद्यालयीन परिसरातील झाडांसाठी सेंद्रिय खत म्हणूनवापर करण्यात येणार आहे.






तसेच दिनांक १८ सप्टेंबर २०२४ वार बुधवार रोजी ग्रीन क्लब व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकां मार्फत नदी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यात प्रामुख्याने जाफराबाद शहराची जीवनदायिनी पूर्णानदी येथे

स्वयंसेवकांनी नदी पात्रामधील निर्माल्य, प्लास्टिक बॅग व इत्यादी प्लास्टिक साहित्य नदीपात्रातून काढून नदीपात्र स्वच्छ करण्यात आले.

या अभियानासाठी प्राचार्य डॉ. र . तु. देशमुख उपप्राचार्य विनोद हिवराळे तसेच ग्रीन क्लबचे प्रमुख प्रा. मनीष बनकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. संजय साळवे, डॉ. निलेश भोसले भोसले, डॉ. डी. टी. तांगडे, डॉ. मोहरी एस. पी. डॉ. संतोष पहारे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने स्वयंसेवक विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.